सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २७० | सोमवार, दि. २२ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

सोने-चांदी

आजचे भाव

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४६८००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३४५००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १११६००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २४००/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन





श्री. अभिनय मुंदडा
अमळनेर



श्री. राहुल पाटील
प्रताप महाविद्यालय

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!





अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था, मा. ना. श्री. गुलाबरावजी पाटील सोशल फाऊंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाऊंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी आयोजित भव्य मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिरात सहभागी झालेले नागरिक. दुसऱ्या छायाचित्रात नेत्र तपासणी करताना नेत्रतज्ज्ञ.

# मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेले रुग्ण वाहनाद्वारे पनवेल येथे रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था, मा. ना. श्री. गुलाबरावजी पाटील सोशल फाऊंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाऊंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी आयोजित भव्य मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजातील गरजू आणि ज्येष्ठ नागरिकांना नेत्र आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदविला.

शिबिरादरम्यान नेत्रतज्ज्ञ डॉ. विजय बामणे, डॉ. गुरुप्रीत सिंग, डॉ. राहुल पाटील, डॉ. भूपेंद्र वाघ यांच्यासह निशा शिंदे व प्राची गायकवाड यांनी नागरिकांची नेत्र तपासणी केली. एकूण ७३ नागरिकांनी शिबिरात सहभाग नोंदविला. सखोल वैद्यकीय तपासणीनंतर ३९ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले. पात्र रुग्णांची आवश्यक कागदपत्रे व वैद्यकीय नोंदी पूर्ण करण्यात आल्या. तत्पूर्वी नेत्रतज्ज्ञांचा रुग्णांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या वतीने पात्र ठरलेल्या सर्व रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेसाठी पाठविण्याची वाहन व्यवस्था करण्यात आली. हे सर्व रुग्ण दुपारी साडेचार वाजता श्री मंगळग्रह मंदिरातून पनवेलकडे रवाना झाले. शस्त्रक्रियेसह आवश्यक वैद्यकीय सुविधा आणि पुढील उपचारांची व्यवस्था संबंधित रुग्णालयामार्फत करण्यात येणार आहे. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे मंगळग्रह सेवा संस्थेचे विश्वस्त मंडळ, सेवेकरी तसेच वैद्यकीय पथक यांनी विशेष परिश्रम घेतले. नागरिकांनीही अशा सामाजिक उपक्रमांचे स्वागत करत भविष्यातही अशाच आरोग्यविषयक शिबिरांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

समाजातील दुर्बल घटकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी मंगळग्रह सेवा संस्था सातत्याने कार्यरत आहे. त्या अनुषंगाने दर महिन्यातील तिसऱ्या रविवारी भव्य मोफत मोतीबिंदू शिबिराचे आयोजन केले जाते. भविष्यातही विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविणे मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरूच राहतील, असे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी यांनी सांगितले.




*शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेले रुग्ण पनवेल येथे रवाना होताना.*




अमळनेर : शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे गट) उपनेत्या सौ. शीतलताई म्हात्रे, सौ. सजनाताई घाडी, जळगाव जिल्हा महिला आघाडी प्रमुख सौ. सरिताताई माळी-कोल्हे, सौ. सुरेखाताई पवार, उपजिल्हाप्रमुख वासुदेव पवार व अमळनेर शहरप्रमुख भरत पवार यांनी रविवार, दि. २१ जून रोजी श्री मंगळग्रह मंदिरास सदिच्छा भेट देऊन श्री मंगळग्रह देवांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे सौ. म्हात्रे व सौ. घाडी यांचा यथोचित सन्मान करताना अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले. शेजारी सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम व खजिनदार गिरीश कुलकर्णी. (छायाचित्र : नितेश बारी)

# वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर ऐच्छिकच!

## मग महावितरणने आतापर्यंत बसविलेल्या लाखो मीटरचे काय होणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यभरात स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर महावितरणने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण देत स्मार्ट मीटर बसविणे ग्राहकांसाठी बंधनकारक नसून ऐच्छिक असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्यभरात आतापर्यंत बसविण्यात आलेल्या लाखो स्मार्ट मीटरबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ग्राहकांना निवडीची मुभा असेल, तर आधीच बसविलेल्या मीटरचे भवितव्य काय, हा मुद्दा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

पान २ वर

### सध्याचे मीटर प्रीपेड की पोस्टपेड?

मात्र, महावितरणच्या न्यायालयातील भूमिकेमुळे राज्यभरात आधीच बसविण्यात आलेल्या पोस्टपेड स्मार्ट मीटरबाबतही नव्याने चर्चा सुरू झाली आहे. जर प्रीपेड स्मार्ट मीटर ऐच्छिक असतील, तर ज्या ग्राहकांच्या घरी पोस्टपेड मीटर बसविण्यात आले आहेत त्यांच्यासाठी पुढील धोरण काय असेल, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. तसेच स्मार्ट मीटर नको असलेल्या ग्राहकांना जुन्या मीटरची सुविधा कायम ठेवली जाईल का? हा प्रश्नही उपस्थित होत आहे. दरम्यान, महावितरणने स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) मीटरचे फायदे अधोरेखित केले आहेत. या मीटरमुळे ग्राहकांना विजेच्या वापराची अचूक माहिती रिअल टाइममध्ये उपलब्ध होते. वापरावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. तसेच दिवसा वीज वापर करणाऱ्या घरगुती ग्राहकांना सवलतीचाही लाभ मिळतो. विशेष म्हणजे हे टीओडी मीटर प्रीपेड नसून पोस्टपेड स्वरूपाचे आहेत. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच वीज वापरल्यानंतरच ग्राहकांना वीजबिल प्राप्त होणार आहे. हे मीटर मोफत बसविण्यात येत असून, ग्राहकांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडत नसल्याचा दावा महावितरणने केला आहे.

# श्री मंगळग्रह मंदिरात आरोग्याबाबत जनजागृती

## विविध योगप्रकारांचा झाला सराव; आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शिबिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दरवर्षीप्रमाणे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिर परिसरात रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात मंगळग्रह सेवा संस्थेचे विश्वस्त मंडळ, मंगल सेवेकरी तसेच मंदिराच्या सेवेकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सकाळच्या प्रसन्न वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमामुळे आरोग्याबाबत जनजागृती होण्यास मदत झाली.

शिबिराची सुरूवात योग प्रार्थनेने करण्यात आली. त्यानंतर योग मार्गदर्शक तथा मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम व खजिनदार गिरीश कुलकर्णी यांनी उपस्थितांना विविध योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा तसेच श्वसनक्रिया यांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. सहभागी सर्वांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन, अनुलोम-विलोम, कपालभाती आदी योगप्रकारांचा सराव केला.

यावेळी मार्गदर्शक बहिरम यांनी योगाचे महत्त्व विशद करताना सांगितले, की योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारी जीवनशैली आहे. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढते, मानसिक ताणतणाव कमी होतो आणि व्यक्तीची एकाग्रता सुधारते. आधुनिक धावपळीच्या जीवनात वाढत्या ताणतणावामुळे अनेक शारीरिक व मानसिक समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत योग हा आरोग्यपूर्ण जीवनासाठी प्रभावी उपाय ठरतो.

योगाच्या फायद्यांविषयी माहिती देताना कुलकर्णी यांनी सांगितले, की नियमित योग केल्याने रक्ताभिसरण सुधारते, स्नायू व सांधे मजबूत होतात, लठ्ठपणा नियंत्रणात राहतो तसेच मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यांसारख्या आजारांचा धोका कमी होण्यास मदत होते. याशिवाय ध्यान आणि प्राणायामामुळे मन शांत राहते, सकारात्मक विचारसरणी विकसित होते आणि झोपेची गुणवत्ता सुधारते.

शिबिरात उपस्थित मान्यवरांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व अधोरेखित करत योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनविण्याचे आवाहन केले. तसेच योगाच्या माध्यमातून निरोगी समाज आणि सशक्त राष्ट्र उभारण्यास हातभार लागेल, असे मत व्यक्त केले.






अमळनेर : दरवर्षीप्रमाणे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिर परिसरात रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात विविध योगप्रकारांचा सराव करताना योग मार्गदर्शक तथा मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम व खजिनदार गिरीश कुलकर्णी यांच्यासह मंगळग्रह सेवा संस्थेचे विश्वस्त मंडळ, मंगल सेवेकरी तसेच मंदिराचे सेवेकरी. (छायाचित्र : मयूर चौधरी)

## संपादकीय

# पाण्याचे संकट म्हणजे सुस्त कारभाराचा मस्त नमुना

काले वर्षतु पर्जन्यः पृथ्वी सश्यशालिनी,
देशोर्य क्षोभरहितः, जनः सन्तु निर्भया।

अशा प्रकारची प्राचीन काळापासून व्यक्त केली गेलेली सनातन प्रार्थना आहे. याचा अर्थ वेळेवर पाऊस व्हावा. पृथ्वी ही विपुल अन्नधान्याने परिपूर्ण व्हावी. आपला देश अशांतीमुक्त व्हावा आणि सर्वांना निर्भयपणे जगता यावे ही केवळ मनोकामना नसून एकूणच मानवाच्या कल्याणाचा तो संकल्प ठरतो. काळाप्रमाणे पुरेसा पाऊस झाला तरच या पुढच्या गोष्टी शक्य होतात. हा त्यातील मतितार्थ आहे. दरवर्षी भारतासारख्या कृषीप्रधान देशात ज्येष्ठ महिन्यापासून पावसाची अक्षरशः चातकाप्रमाणे प्रत्येकजण वाट पाहत असतात. पाऊस येणार याची बळीराजाला खात्री असते. कारण त्याच्या वर्षभराच्या जीवनचक्राचा आधार पाऊस असतो. खरे तर भारताचे अर्थचक्र या पावसावर अवलंबून असते. पाऊस पुरेसा होणे ही तर अत्यंत महत्त्वपूर्ण अपेक्षा असते. परंतु पाऊस थोडा जरी उशिरा आला तरी त्याचे अनेक प्रकारचे विपरित परिणाम तातडीने पाहायला मिळतात. गेल्या पाच–सहा वर्षांपासून भारतात सर्वदूर पावसाने चांगली कृपा केली होती. अन्नधान्याच्या उत्पादनातही चांगली वाढ झाली. धरणे आणि जलसाठे ओसंडून वाहात होते आणि पावसाची अशीच कृपा यावर्षीही राहील. अशी जनसामान्यांची अपेक्षा होती. परंतु यंदा मात्र एकूणच हवामानातल्या वाढत्या तापमानाने पाऊसमानावर अतिशय गंभीर परिणाम झालेला आहे. जून महिन्याचे तीन आठवडे उलटूनही पावसाने कुठेही अपेक्षेप्रमाणे हजेरी लावलेली नाही. अलनिनोसारखा हवामान बदलातील परिणाम पावसावर इतका मोठा प्रभाव टाकेल, अशी शक्यता वाटत नव्हती. परंतु यंदा ही सगळी लक्षणे दिसू लागली आहेत. देशपातळीवर त्याचे वेगवेगळ्या क्षेत्रावरचे प्रभाव दिसू लागले आहेत. महाराष्ट्रातले सगळ्या प्रमुख जलसाठ्यांमधले पाणी संपण्याच्या मार्गावर आहेत. सगळ्या मोठ्या महानगरांमध्ये दहा ते पंधरा टक्के पाणीकपातीला सुरूवात झालेली आहे. प्रत्यक्षात ही कपात जास्त असल्याचेही म्हटले जाते. पुण्यात यंदा प्रथमच एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ आलेली आहे.

राज्य सरकारकडून या पाणीसंकटाची गांभीर्याने दखल घेतली गेली असली तरी ती उशिरा जाग आलेल्या सुस्त कारभाराचा नमुना ठरतो. आता थेट मुख्यमंत्र्यांनी सर्वसामान्य जनतेला पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. जपून वापरा, याचा अर्थ आणि पाणी वाया घालवू नका, इथपर्यंतच त्याचा अर्थ घेता येऊ शकतो. सामान्य माणूस पुरेसे पाणीच उपलब्ध होत नसल्याने त्याला पाणी जपून वापरल्याशिवाय पर्याय उरलेला नाही. पाणी संकट गंभीर झाल्यानंतर हेच पाणी जपून वापरण्याची सूचना करणे हा निव्वळ नियोजनशून्यपणा ठरतो. मुबलक पाणी असले तरीसुद्धा ते सांभाळून किंवा सतर्कतेनेच वापरले पाहिजे आणि हीच पाणी वापरण्याची सतर्कता कोणकोणत्या स्वरूपात असू शकते. याबद्दलची जनजागृती वर्षभर करण्याची आवश्यकता आहे आणि शासकीय कार्यालये अगदी मंत्र्यासंत्र्यांचे बंगले या सगळ्या ठिकाणी पाणी कसे वाचवले जाते आहे हेदेखील लोकांपर्यंत पोहचवण्याची आवश्यकता आहे. याचे कारण असे की, सामान्य जनतेला पाणी वाचवण्याचे आवाहन करणे म्हणजे राजकीय उपदेश करून फार मोठी जबाबदारी पार पाडल्याचा अविर्भाव केला जातो. प्रत्यक्षात शासकीय कार्यालये आणि अनेक प्रकारच्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये पाण्याचा वाटेल तसा अपव्यय होत असतो. आज बाटलीबंद पाणी मिळण्याची सोय झालेली आहे. अनेक सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये शेकडो लीटर पाण्याच्या बाटल्या आणल्या जातात आणि अर्धे पाणी असलेल्या बाटल्या अक्षरशः फेकून दिल्या जात असतात. आज या पुणे महापालिकेने एक दिवसाआड पाणी द्यायची घोषणा केलेली आहे. त्या पुणे महापालिकेतसुद्धा पाण्याच्या काटकसरीची कोणतीही जाणीवपूर्वक उपाययोजना केली गेलेली नाही. तीच परिस्थिती मुंबई, नाशिक, नागपूर, संभाजीनगर यासारख्या महानगरांची आहे. सरकार पुरेसे पाणी पुरवू शकणार नाही याची पूर्ण कल्पना लोकांना असते. म्हणूनच ते आपापल्या क्षमतेप्रमाणे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करतात. अगदी ज्यादा पैसे मोजून टँकरने पाणी भरण्यापासून ते विकत मिळणाऱ्या कॅन्सच्या माध्यमातून ते आपली पाण्याची गरज भागवतात.

आज राज्यातील परिस्थिती अधिक गंभीर झालेली आहे. अगदी विविध बांधकामांवर पाणी वापराची मर्यादा घातली गेलेली आहे. हीच परिस्थिती या महिनाअखेरपर्यंत राहिली तर पाण्याचे रेशनिंग करण्याची वेळ येऊ शकते. मुंबईसारख्या महानगराची तर मोठीच दैना होऊ शकेल. तीन महिन्यांपूर्वी वेधशाळांनी पाऊस कमी पडण्याचे अंदाज दिले होते. तेव्हापासूनच पाणी वापराच्यासंदर्भात काही प्राथमिक उपाययोजना आवश्यक होत्या परंतु संकट जेव्हा अंगावर येते त्याचवेळेला उपाययोजना करण्याचा हा प्रकार अत्यंत संतापजनक ठरतो. भारतच नव्हे तर जगभर पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होते आहे. यासाठी पावसामार्फत उपलब्ध होणाऱ्या पाण्याची अधिकाधिक साठवणूक करणे, पावसाचा थेंब न थेंब कसा वाचेल किंवा पावसाचे पाणी वाया जाणार नाही. याबाबतच्या ठोस आणि आधुनिक पद्धतीच्या उपाययोजना अत्यंत गरजेच्या ठरतात. गेल्या वीस–पंचवीस वर्षांपासून जलपुनर्भरण योजनेचा नुसता ढोल बडवला जातो आहे. पण जलपुनर्भरण योजनेचे एकही उत्कृष्ट किंवा आदर्श उदाहरण समोर आलेले नाही. धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर येथे विहिरींमध्ये या जलपुनर्भरणाचे यशस्वी प्रयोग झाले. त्याला शिरपूर पॅटर्न म्हणूनही ओळखले जाते. जागतिक स्तरावर त्याची दखलही घेतली जाते आहे. परंतु असे प्रयोग राज्यात ठिकठिकाणी राबवावेत अशी सतर्कता राज्य सरकार दाखवू शकलेले नाही. जर अशा उपाययोजना केल्या असत्या तर आज काही प्रमाणात या पाणी संकटावर मात करता आली असती.

# अनुश्री चौधरीचा बालयोगाचार्य म्हणून सत्कार

## जागतिक योग दिनानिमित्त जी. एस. हायस्कूलमध्ये कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील भगिनी मंडळ शाळेतील इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी अनुश्री मनोज चौधरी हिने बालयोग प्रशिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत नावलौकिक मिळविला आहे. जागतिक योग दिनाचे औचित्य साधून रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी ७ वाजता खानदेश शिक्षण मंडळाच्या गंगाराम सखाराम हायस्कूलमध्ये आयोजित कार्यक्रमात तिने विविध योगासने उत्कृष्टरीत्या सादर केली.

योग सादरीकरणासाठी जळगाव जिल्हा योग शिक्षण महामंत्री सौ. ज्योतीताई पाटील यांनी तिला मार्गदर्शन केले. अनुश्रीने आत्मविश्वासाने आणि प्रभावी पद्धतीने योगासने सादर करून उपस्थितांची मने जिंकली.यावेळी प्रमुख पाहुणे मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम व खजिनदार गिरीश कुळकर्णी यांच्या हस्ते अनुश्रीचा बालयोगाचार्य म्हणून सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक विनोद कदम, उपमुख्याध्यापक ए. डी. भदाणे, के. पी. पाटील यांच्यासह शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अनुश्रीच्या यशाचे कौतुक करत तिला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



*अमळनेर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त येथील जी. एस. हायस्कूलमध्ये रविवारी, दि. २१ जून रोजी सकाळी झालेल्या कार्यक्रमात भगिनी मंडळ शाळेतील तिसरीची विद्यार्थिनी अनुश्री चौधरीचा बालयोगाचार्य म्हणून गौरव करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ए. डी. भदाणे, के. पी. पाटील.*

# माधुरी दीक्षितचे पती डॉ. श्रीराम नेने रोज सकाळी करतात 'हे' एक काम

## अनेकांना माहीतच नाही 'ही' सवय! यशस्वी लोक मात्र कधीच चुकवत नाहीत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुष्यात यशस्वी व्हायचे, निरोगी राहायचे आणि मानसिकदृष्ट्या मजबूत बनायचे असेल तर रोज सकाळी कोणती सवय लावावी हा प्रश्न अनेकांच्या मनात असतो. काही जण व्यायामाला महत्त्व देतात, तर काही ध्यानधारणा किंवा योगाभ्यासाला. मात्र, सध्या सोशल मीडियावर एका अशा सवयीची चर्चा होत आहे, जी यशस्वी आणि निरोगी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

विशेष म्हणजे ही सवय प्रसिद्ध डॉक्टर आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन करणारे डॉ. श्रीराम नेने स्वतः अनेक वर्षांपासून पाळत आहेत. त्यांनी नुकत्याच एका व्हिडिओमध्ये या सवयीविषयी माहिती दिली असून ती ऐकून अनेकजण आश्चर्य व्यक्त करत आहेत.

**नेमके ते रोज सकाळी असे काय करतात?**

डॉ. नेने यांच्या मते दिवसातील पहिला एक तास स्वतःसाठी राखून ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. ते या वेळेला 'पॉवर अवर' असे संबोधतात. या एका तासात ते आपल्या आयुष्याचा, ध्येयांचा आणि भविष्यातील नियोजनाचा विचार करतात. मात्र, सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या वेळेत ते स्वतःवर लक्ष केंद्रित करतात. त्यांच्या मते अनेक लोक स्वतःची काळजी घेण्याऐवजी सतत इतरांची मदत करण्यात व्यस्त असतात. त्यामुळे स्वतःच्या गरजा, आरोग्य आणि मानसिक स्वास्थ्य याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. यासाठी त्यांनी विमानातील एका महत्त्वाच्या सूचनेचे उदाहरण दिले. विमान प्रवासादरम्यान आपत्कालीन परिस्थितीत प्रथम स्वतःचा ऑक्सिजन मास्क लावण्यास सांगितले जाते आणि त्यानंतर इतरांना मदत करण्यास सांगितले जाते. कारण आपण स्वतः सुरक्षित असलो तरच इतरांना मदत करू शकतो.

डॉ. नेने सांगतात, की आयुष्यातही हाच नियम लागू होतो. जर आपण स्वतःसाठी वेळ दिला नाही तर दीर्घकाळ निरोगी, आनंदी आणि उत्पादक राहणे कठीण होऊ शकते. दरम्यान, योग प्रशिक्षक आणि हॅबिल्डचे संस्थापक सौरभ बोथरा यांनीही या सवयीचे महत्त्व स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते अनेक लोक नवीन सवय सुरू करतात, पण काही दिवसांनी ती सोडून देतात. कारण ते पहिल्याच दिवसापासून सर्व काही परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. मात्र, शिस्त ही एका दिवसात तयार होत नाही. सातत्याने एखादी चांगली सवय पाळल्यास मेंदू हळूहळू त्या सवयीशी जुळवून घेतो. काही दिवस कठीण जातात, तर काही दिवस सहज वाटतात. पण, सातत्य ठेवल्यास ती सवय आपल्या जीवनाचा नैसर्गिक भाग बनते.सकाळच्या शांत वातावरणात मिळणारा वेळ हा स्वतःचा विचार करण्यासाठी, दिवसाचे नियोजन करण्यासाठी आणि वैयक्तिक प्रगतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. त्यासाठी पहाटे ४ वाजताच उठणे आवश्यक नाही. महत्त्वाचे म्हणजे दिवसातील काही वेळ फक्त स्वतःसाठी राखून ठेवणे. अनेकांना वाटत असेल, की हा सल्ला देणारे डॉ. नेने नेमके कोण आहेत? तर ते एक प्रसिद्ध हृदय व रक्तवाहिनीसंबंधी शल्यचिकित्सक आहेत. तसेच ते अभिनेत्री माधुरी दीक्षित यांचे पती असून आरोग्य, फिटनेस आणि निरोगी जीवनशैलीविषयी नियमितपणे मार्गदर्शन करत असतात. त्यांच्या मते, दररोज स्वतःसाठी दिलेला एक तास तुमच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याला नव्या उंचीवर घेऊन जाऊ शकतो.



# तुमचाच पैसा ठरतो तुमचा सर्वांत मोठा शत्रू?

## पैसा कसा करतो तुमच्या आयुष्याचे वाटोळे? चाणक्यांचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आचार्य चाणक्य हे भारतीय इतिहासातील महान विद्वान, अर्थशास्त्रज्ञ आणि नीतिशास्त्राचे अभ्यासक मानले जातात. त्यांच्या चाणक्य नीतिमध्ये जीवनातील विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यामध्ये पैसा आणि त्याचा योग्य वापर याबाबतही महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. चाणक्यांच्या मते पैसा हा व्यक्तीच्या जीवनातील मोठी ताकद आहे. मात्र, त्याचा चुकीचा वापर केला तर तोच पैसा संकटाचे कारण बनू शकतो.

**पैसा कधी ठरतो शत्रू?**

चाणक्यांच्या मते व्यक्ती जेव्हा पैशाचा वापर विचार न करता करते, तेव्हा पैसा त्याच्यासाठी अडचणी निर्माण करू शकतो. केवळ दिखावा, इतरांशी तुलना किंवा गरज नसताना केलेला खर्च आर्थिक नुकसान करू शकतो. काही लोकांना महागड्या वस्तू खरेदी करणे, ऐशआरामाचे जीवन जगणे किंवा समाजात प्रतिष्ठा दाखवण्यासाठी खर्च करण्याची सवय असते. अशा सवयींमुळे उत्पन्नापेक्षा खर्च वाढतो आणि भविष्यात आर्थिक संकटांना सामोरे जावे लागू शकते.

**अनावश्यक खर्च वाढवतो समस्या**

चाणक्य सांगतात, की जो व्यक्ती आपल्या इच्छा आणि गरजा यामधील फरक समजून घेत नाही, त्याला आर्थिक अडचणी येण्याची शक्यता असते. विनाकारण खर्च, बचतीकडे दुर्लक्ष आणि केवळ सुखसोयींसाठी पैशाचा वापर केल्याने कर्ज, तणाव आणि आर्थिक असुरक्षितता निर्माण होऊ शकते. त्यामुळे पैशाचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे.

**योग्य वापर केल्यास पैसा बनतो मित्र**

चाणक्यांच्या मते पैसा योग्य पद्धतीने वापरला तर तो आयुष्यात मोठा आधार ठरतो. दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी, कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी आणि भविष्यासाठी केलेली बचत ही पैशाची योग्य दिशा आहे. कठीण काळासाठी बचत करणे आणि योग्य ठिकाणी गुंतवणूक करणे यामुळे पैसा संकटाच्या वेळी मदतीला येतो.

### आर्थिक स्थैर्यासाठी चाणक्यांचे नियम

चाणक्य नीतीनुसार आर्थिक स्थैर्य मिळविण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे. गरजेपुरताच खर्च करावा. भविष्यासाठी नियमित बचत करावी. पैशाचा उपयोग विचारपूर्वक करावा. दिखावा करण्यासाठी खर्च टाळावा. उत्पन्न वाढविण्यासोबत आर्थिक नियोजन करावे. चाणक्यांच्या विचारानुसार पैसा स्वतः चांगला किंवा वाईट नसतो, तर त्याचा वापर करणाऱ्या व्यक्तीच्या विचारांवर त्याचे परिणाम अवलंबून असतात. योग्य नियोजन, बचत आणि शिस्तीने वापरलेला पैसा मित्रासारखा साथ देतो; तर चुकीच्या सवयींमुळे तोच पैसा संकटाचे कारण बनू शकतो.

# वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर ऐच्छिकच!

पान १ वरून : स्मार्ट मीटरच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या एका याचिकेवरील सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्याने महावितरणवर सध्या कार्यरत वीजमीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याचा अनावश्यक अट्टाहास केल्याचा आरोप केला. स्मार्ट मीटर ग्राहकांच्या हिताचे नसल्याचे सांगत महावितरणकडून पाठविण्यात आलेल्या संदेशामुळे ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. संबंधित संदेशात ४८ तासांनंतर स्मार्ट मीटर बसविण्यात येणार असल्याचा उल्लेख होता. यावर महावितरणने यापूर्वीच प्रसिद्ध केलेल्या स्पष्टीकरणाचा दाखला देत न्यायालयाने प्रीपेड स्मार्ट मीटर बंधनकारक नसल्याचे नमूद केले. ग्राहकांना प्रीपेड स्मार्ट मीटर स्वीकारायचे की नाही, याचा पर्याय उपलब्ध असून, अंतिम निर्णय ग्राहक स्वतः घेऊ शकतात, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यानंतर न्यायालयाने याचिकाकर्त्याला विरोध नेमका स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेला आहे की प्रीपेड स्मार्ट मीटरला, असा थेट प्रश्न विचारला.तथापि, न्यायालयातील सुनावणीनंतर एक महत्त्वाचा प्रश्न कायम आहे. प्रीपेड स्मार्ट मीटर लावणे जर ग्राहकांच्या इच्छेवर अवलंबून असेल, तर राज्यभरात आतापर्यंत बसविण्यात आलेल्या पोस्टपेड स्मार्ट मीटरचे काय होणार? तसेच भविष्यातील मीटर बदल धोरण काय असेल? याबाबत महावितरणकडून अधिकृत आणि सविस्तर भूमिका स्पष्ट होण्याकडे लाखो वीज ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

# तुमच्या मुलांना जेवताना मोबाईल लागतो का?

## या सवयीमुळे थांबू शकते त्यांची वाढ; संशोधनातून मोठा दावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेव्हा लहान मूल खूप रडत असते किंवा जेवताना त्रास देते तेव्हा त्याला समजावण्याचे, गुंतवून ठेवण्याचे मोबाईल एक माध्यम बनले आहे. मुलांनी त्रास दिल्यावर त्यांच्या हातामध्ये मोबाईल द्यायचा आणि त्यांना तात्पुरते शांत करायचे, हा उपाय आजकालचे पालक सर्रासपणे वापरताना दिसतात. पण या सवयीमुळे मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असतील तर? आत्ताच समोर आलेल्या एका संशोधनानुसार स्मार्टफोन आणि टॅब्लेटच्या जास्त वापरामुळे मुलांच्या शारीरिक आणि बौद्धिक क्षमतेवर गंभीर परिणाम होत आहेत. पीजीआय चंदीगड येथील बालरोगविषयक आणि सामाजिक बालरोग विभागातील प्राध्यापिका भवनीत भारती आणि त्यांच्या टीमने केलेल्या संशोधनानुसार १८ महिन्यांच्या वयापर्यंत जवळजवळ ६८ टक्के मुले ही स्क्रीनच्या थेट संपर्कात आलेली आहेत. याचा अर्थ दीड वर्षाचा मुलगाही मोबाईलचा वापर करतो.

**१८ ते २४ महिने वयोगटातील मुलांचा केला गेला अभ्यास**

इंडिया पीडियाट्रिक्स मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात १८ ते २४ महिन्यातील



मुलांचा समावेश केला गेला. जास्त स्क्रीन पाहिल्यानंतर मुलांच्या शिकण्याच्या आणि बोलण्याच्या क्षमतेवर परिणाम होत आहे, असे या संशोधनातून समजले. एवढेच नव्हे तर जेवताना मोबाईल पाहण्याच्या वाईट सवयीमुळे भाषा आणि एकाग्रता या क्षमतासुद्धा बिघडत आहेत.

**३३ टक्के मुले रोज एका तासापेक्षा जास्त मोबाईल वापरतात**

अभ्यासात दिलेल्या आकडेवाडीनुसार जवळजवळ ३३ टक्के मुले रोज एका तासापेक्षा जास्त वेळ मोबाईलवर घालवतात. परिणामी मुलांचे शारीरिक आरोग्य खराब होत आहे. आणि साहजिकच मुलांचा वेळ हा मोबाईलवर जात असेल तर त्यांची बाहेर खेळण्याची सवयी कमी झालेली पाहायला मिळाली.

**स्क्रीन टाइम कमी असलेल्या मुलांमध्ये जास्त कौशल्य**

संशोधनात असेही आढळून आले आहे, की या वयोगटातील ज्या मुलांचा स्क्रीन टाइम कमी असतो, त्यांच्यामध्ये समस्या सोडवण्याची कौशल्ये अधिक चांगली असतात. त्यामुळे, लहान मुलांच्या वैयक्तिक आणि सामाजिक विकासात 'स्क्रीन टाइम' हा एक मोठा अडथळा असल्याचे या अभ्यासातून समोर येते.

**स्क्रीन टाइम कसा कमी करता येईल?**

डॉ. भवनीत भारती यांच्या मते सतत स्क्रीन पाहण्यापेक्षा आपल्या आजूबाजूला असलेल्या लोकांशी , जसे की आई–वडील, बहिण–भाऊ, मित्र–मैत्रिणी यांच्याशी डायरेक्ट गप्पा मारल्या, काही संवाद साधला तर आपल्या ज्ञानात भर पडायला मदत होते. इतकेच नाही, तर नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. लहान मुलांचा मानसिक विकास होण्यासाठी आणि शारीरिकदृष्ट्या त्यांना सक्रिय ठेवण्यासाठी मोबाईल, लॅपटॉपची नाहीस तर आपल्या लोकांशी होणाऱ्या संवादाची आणि खेळण्याची गरज असते.

## अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समिती
## दैनिक बाजारभाव

| प्रकार | भाव | |
|---|---|---|
| | कमी | जास्त |
| गहू | २३२१ | २३८१ |
| बाजरी | २२०० | २३४१ |
| दादर | २९०० | ३००० |
| हा.ज्वारी | २३०० | २३८१ |
| मका लाल | २०६७ | २०८७ |
| मुंग | ७३२५ | ७५०० |
| उडीद | -- | ७५०० |
| हरभरा काबुली व्ही.टू. | ५७०० | ६२३१ |
| हरभरा गावराणी | -- | -- |
| हरभरा गुलाबी | ५००० | ५१०० |
| हरभरा चापा | ५४७५ | ५५०० |
| हरभरा डॉलर सफेद | ६८०० | ६९०० |
| हरभरा गुल्लर | -- | -- |
| चवळी | ५२०० | ५५५५ |
| तूर | ६९५१ | ७१०० |
| शेंगा | -- | ७९०० |
| तीळ | -- | ९२०० |
| सोयाबीन | -- | -- |
| सूर्यफुल | -- | -- |
| धणे | १४८०० | १५००० |
| जिरे | -- | -- |
| पांढरी तूर | -- | -- |

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# लोकांनी टोमणे मारले; एलएलबी करताना दिली यूपीएससी
# आज पुण्यात ऑफिसर; आयपीएस तेजस्वी सातपुते यांचा प्रवास



सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यूपीएससी ही सर्वांत कठीण परीक्षांपैकी एक आहे. यूपीएससी परीक्षा देऊन प्रशासकीय सेवेत काम करण्याची संधी मिळते. दरम्यान, यूपीएससी परीक्षा पास करण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. दिवसरात्र अभ्यास करावा लागतो. अनेकदा यूपीएससी परीक्षेत अपयश येते. परंतु अपयश ही यशाची पहिली पायरी असते. काही जण पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होतात. असेच काहीसे तेजस्वी सातपुते यांच्यासोबत झाले. त्या आज आयपीएस अधिकारी म्हणून पुणे येथे कार्यरत आहेत

**एलएलबीनंतर दिली यूपीएससी परीक्षा**

तेजस्वी या मूळच्या अहिल्यानगरच्या शेवगावच्या रहिवासी आहेत. त्यांची आई शिक्षिका, तर वडील शेती करतात. तेजस्वी लहान होत्या तेव्हा त्यांना पायलट व्हायचे होते. परंतु काही गोष्टींमुळे त्यांना पायलट होता आले नाही.१०-१२ वीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी बायोटेक्नोलॉजीमध्ये शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी एलएलबीचे शिक्षण घेतले. याचदरम्यान त्यांना यूपीएससी परीक्षेबाबत समजले. त्यांनी आपल्या मित्रांना विचारले. यानंतर त्यांनी मित्रांसोबत परीक्षेची तयारी सुरू केली.

**लोकांचे टोमणे ऐकले, तरीही हार मानली नाही**

तेजस्वी यांनी तिसऱ्यांदा फील्ड बदलली होती. पहिल्यांदा बायोटेक्नोलॉजी, त्यानंतर एलएलबी आणि नंतर यूपीएससी यामुळे त्यांना अनेक टोमणे ऐकून घ्यावे लागले. एकाही फील्डमध्ये चांगले काम करू शकत नाही, असे बोलत लोकांनी हिणवले. परंतु तरीही त्यांनी हार मानली नाही. त्यांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. एलएलबी करत असतानाच तेजस्वी यांनी पहिल्यांदा यूपीएससी परीक्षा दिली. त्यांना अपयश आले. परंतु त्यांनी जिद्द कायम ठेवली. त्यांनी मुंबईला जाऊन अभ्यास करण्याचे ठरविले. एका वर्षासाठी त्यांनी खूप अभ्यास केला. २०१२ मध्ये त्यांना यूपीएससी परीक्षेत १९८ रँक मिळाली. त्या २०१२ च्या महाराष्ट्र कॅडरच्या आयपीएस अधिकारी आहेत. त्यांची नुकतीच पुणे क्राइम ब्रँचमध्ये अतिरिक्त पोलिस आयुक्त म्हणून बदली करण्यात आली.

# सप्ताह में सिर को कितनी बार धोना है सेहत के लिये जरूरी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बालों की सफाई स्कैल्प की सेहत के लिए जरूरी, सामान्य बाल २-३ बार, तैलीय ३-४, सूखे और घुंघराले १-२ बार धोएं, गुनगुना पानी, हल्का शैम्पू और कंडीशनर अपनाएं। जिससे आप के बाल हेल्दी रहेंगे. तो इन तरीकों को जरूर ट्राई करें।



बालों की सफाई (हेयर वॉश) सिर्फ दिखावे के लिए ही नहीं, बल्कि स्कैल्प (खोपड़ी) की सेहत के लिए भी बेहद जरूरी है। अक्सर लोगों के मन में यह सवाल रहता है कि सप्ताह में कितनी बार सिर धोना सही होता है। इसका जवाब हर व्यक्ति के बालों के प्रकार, लाइफस्टाइल और मौसम पर निर्भर करता है।

**सप्ताह में कितनी बार बाल धोएं?**

**आमतौर पर :**

सामान्य बाल : सप्ताह में २--3 बार

तैलीय बाल : 3--4 बार या जरूरत अनसार सूखे बाल : 1--2 बार

घुंघराले बाल : 1--2 बार ही काफी होते हैं जिन लोगों को ज्यादा पसीना आता है, धूल-मिट्टी में काम करते हैं या जिम जाते हैं, उन्हें बाल थोड़े ज्यादा बार धोने की जरूरत पड़ सकती है।

**ज्यादा या कम धोने के नुकसान**

बहुत ज्यादा धोने से : स्कैल्प की नैचुरल नमी खत्म हो जाती है, जिससे बाल रूखे और कमजोर हो सकते हैं। बहुत कम धोने से : स्कैल्प में गंदगी, पसीना और तेल जमा हो जाता है जिससे डैंड्रफ और खुजली की समस्या हो सकती है।

**बाल धोने का सही तरीका**

बालों को अच्छी तरह गीला करें।

गुनगुने पानी का इस्तेमाल करें, बहुत गर्म पानी से बाल कमजोर होते हैं।

**शैम्पू सही मात्रा में लें**

शैम्पू को पहले हाथ में पानी के साथ मिलाकर पतला करें, फिर स्कैल्प पर लगाएं।

**हल्के हाथों से मसाज करें**

नाखून से नहीं, उंगलियों के पोरों से धीरे-धीरे मालिश करें।

**अच्छी तरह धोएं**

शैम्पू बालों में रह जाने से स्कैल्प में खुजली हो सकती है।

**कंडीशनर का उपयोग करें**

कंडीशनर को सिर्फ बालों की लंबाई (लेंथ) पर लगाएं, स्कैल्प पर नहीं।

**तौलिये से हल्के हाथों से सुखाएं**

रगड़ने से बाल टूट सकते हैं, इसलिए थपथपाकर सुखाएं।

**सही प्रोडक्ट चुनें**

बालों के प्रकार के अनुसार ही शैम्पू और कंडीशनर चुनना जरूरी है।

**कुछ अतिरिक्त टिप्स**

हफ्ते में १ बार तेल मालिश करने से स्कैल्प स्वस्थ रहता है। केमिकल वाले प्रोडक्ट्स का कम इस्तेमाल करें। बाल धोने के लिए बहुत ठंडा या बहुत गर्म पानी न लें। गीले बालों में कंघी करने से बचें।

# रात्री झोपताना घरात शिंपडा ‘हा’ द्रव पदार्थ

## साप कधीच पुन्हा जवळ येणार नाही, सर्पमित्रांनी सांगितला रामबाण उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेकदा झोपेत सर्पदंश होतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीला झोपेत साप चावतो तेव्हा त्या व्यक्तीचा मृत्यू होण्याची शक्यता अधिक असते. कारण आपल्याला साप चावला आहे, हे त्या व्यक्तीला लवकर कळतच नाही. जेव्हा कळते तोपर्यंत उपचारासाठी खूप उशीर झालेला असतो, अशा स्थितीमध्ये या व्यक्तीचा मृत्यू देखील होऊ शकतो.

आता पावसाळा सुरू झाला आहे. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये साप बिळाबाहेर निघण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते. कारण पावसाळ्यात त्यांच्या बिळात पाणी जाते. त्यामुळे साप बिळातून बाहेर पडतात. अशावेळी ते नेहमी कोरड्या आणि सुरक्षित जागेचा शोध घेत असतात. जर तुमच्या घरात त्यांना अशी जागा मिळाली तर ते तेथे लपून बसतात. तुमचे थोडे जरी दुर्लक्ष झाले तरी देखील तुम्हाला अशा स्थितीत सर्पदंश होऊ शकतो. त्यामुळे कधीही आपल्या घरामध्ये पसारा होणार नाही याची काळजी घ्यावी, घर नेहमी स्वच्छ ठेवावे, तसेच तुमच्या परिसरात किंवा घराजवळ पावसाळ्याच्या दिवसांमध्ये कधीही जास्त गवत वाढू देऊ नये. ज्यामुळे तुम्ही सापांपासून सुरक्षित राहाल.



भारतामध्ये सापांच्या हजारो प्रजाती आढळून येतात, परंतु त्यातील सर्वच साप हे काही विषारी नाहीत. त्यापैकी काही सापांच्या जातीच या विषारी आहेत, यामध्ये मण्यार, फुरसे, घोणस आणि नाग या चार जाती प्रचंड विषारी असतात. या चारही जाती महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात आढळून येतात. यातील सापाची सर्वात धोकादायक जात म्हणजे मण्यार, कारण या सापाचे वैशिष्ट्य म्हणजे हे साप नेहमी रात्रीच्यावेळीच शिकारीसाठी बाहेर पडतात. अनेकदा तुम्ही झोपेत असताना ते तुमच्या अंथरुणांमध्ये देखील घुसतात. झोपेत तुम्ही बेसावध असतात. अशावेळी त्यांना धक्का लागला की धोका समजून ते तुम्हाला चावा घेतात. मण्यार सापाचे दात हे खूपच बारीक असतात, त्यामुळे आपल्याला काही चावले आहे, हे देखील तुम्हाला कळत नाही. त्यामुळे उपचारासाठी उशीर होतो. हा साप अत्यंत विषारी असल्यामुळे उपचार लवकर न मिळाल्यास तुमचा मृत्यू देखील होतो. महाराष्ट्रात सर्वाधिक मृत्यू हे मण्यार आणि घोणस या दोन सापांच्या चाव्यामुळे होतात.

झोपेमध्ये अशी दुर्घटना घडू नये, म्हणून त्यावर सर्पमित्रांनी एक खास उपाय सांगितला आहे. सापांना कधीही तीव्र वास सहन होत नाही. त्यामुळे काय करायचे कांदा, लसूण, अद्रक हे तीन पदार्थ एकत्र करून त्याचे द्रावण बनवायचे, त्यानंतर हे द्रावण एखाद्या फडक्याच्या मदतीने गाळून तुम्ही जेथे झोपता त्याच्या आसपास आणि घरात शिंपडल्यास साप पुन्हा त्या घरात येत नाही. साप तुमच्याजवळही येणार नाही. कारण या तीव्र वासाचा त्याला त्रास होतो. तसेच घरात झोपताना कधीही खाली जमिनीवर झोपू नका, नेहमी बेडवरच झोपावे, असा सल्ला देखील सर्पमित्रांनी दिला आहे.

# हापूस विसरा, अयोध्येत पिकला तीन लाख रुपये किलोचा आंबा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोकणचा हापूस आंबा आपल्या चवीसह आणि उच्च बाजारभावामुळे नेहमीच चर्चेत असतो. मात्र, यंदा एका वेगळ्याच आणि जगातील सर्वांत महागड्या आंब्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

**जपानमधील प्रसिद्ध ‘मियाझाकी’ आंबा**

जपानमधील प्रसिद्ध ‘मियाझाकी’ आंबा, ज्याला ‘एग ऑफ द सन’ म्हणूनही ओळखले जाते, आता अयोध्येच्या मातीत यशस्वीपणे पिकवण्यात आला आहे.



**‘राम लल्लां’च्या चरणी अर्पण**

विशेष म्हणजे या दुर्मिळ आंब्याचे पहिले फळ अयोध्येतील प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंदिरात प्रभू राम लल्लांच्या चरणी अर्पण करण्यात आले.

**‘मियाझाकी’ची किती किंमत?**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ‘मियाझाकी’ आंब्याची किंमत तब्बल २.५ लाख ते ३ लाख रुपये प्रतिकिलो इतकी असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे हा आंबा जगातील सर्वांत महागड्या आंब्यांपैकी एक मानला जातो.

**दोन वर्षांपूर्वी रोपांची लागवड**

अयोध्येतील शेतकरी ओमप्रकाश सिंह यांनी दोन वर्षांपूर्वी प्रायोगिक तत्त्वावर या आंब्याच्या रोपांची लागवड केली होती.

**अयोध्येच्या हवामानात झाड टिकणार!**

सुरूवातीला अनेकांनी अयोध्येच्या हवामानात हे झाड टिकणार नसल्याचा अंदाज व्यक्त केला होता. मात्र, सर्व अंदाज खोटे ठरवत हे झाड स्थानिक वातावरणात चांगलेच रुजले.

**डझनभर फळे लागली**

यंदाच्या हंगामात या झाडाला सुमारे डझनभर फळे लागली असून, एका आंब्याची किंमत जवळपास एक लाख रुपयांच्या घरात असल्याचे सांगितले जात आहे.

**पहिले फळ देवाला अर्प**

भारतीय परंपरेनुसार बागेतील पहिले फळ देवाला अर्पण करण्याची प्रथा जपत ओमप्रकाश सिंह यांनी झाडावरील पहिले मियाझाकी आंब्याचे फळ तुळशीपत्रासह राम लल्लांना अर्पण केले.

# औषध संपल्यावर त्याची रिकामी पाकिटे फेकून देता?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

औषधे संपल्यानंतर उरणाऱ्या ब्लिस्टर पाकिटाचा घरातील अनेक कामांसाठी पुनर्वापर करता येतो. जळलेली कढई स्वच्छ करण्यासाठी रिकाम्या पट्टीचे छोटे तुकडे करून स्क्रबरप्रमाणे वापरल्यास जळलेले डाग आणि हट्टी घाण काढण्यास मदत होते. फॉइलची खडबडीत पृष्ठभाग भांड्यांवरील चिकटलेली घाण साफ करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

**गॅस स्टोव्हचे कोपरे स्वच्छ करा**

पट्टीचे पातळ कडे बर्नर, बटणे आणि अरुंद जागांमधील साचलेली घाण सहज काढू शकता. कात्रीची धार, नेल कटर अधिक प्रभावी बनवा रिकाम्या औषधांच्या पट्ट्या काही वेळा कापल्यास कात्रीची धार चांगली होण्यास मदत मिळू शकते.

**मिक्सर ब्लेड धार टिकवण्यासाठी**

काही लोक पट्टीचे छोटे तुकडे मिक्सरमध्ये फिरवतात. मात्र हा उपाय करताना काळजी घ्या आणि जार नीट स्वच्छ धुवा.

**बियाणे साठवण्यासाठी उत्तम**

गार्डनिंगची आवड असणाऱ्यांसाठी या पट्ट्या लहान बियाणे सुरक्षित ठेवण्याचा सोपा पर्याय ठरू शकतात.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी

एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे

॥ श्री हनुमंत कृपा ॥
एस के ज्वेलर्स सन-१९८८
गोल्ड । डायमंड । सिल्वर
नवीन जागेत


एसके ज्वेलर्स
शाखा नं. 2
916 दागिन्यांना मजुरी 4% पासून
नगरपरिषद जवळ शॉपिंग कॉम्प्लेक्स स्टेशन रोड अमळनेर




# ध्यानलिंगम : भगवान शिवजींचे सुंदर आणि अलौकिक मंदिर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ध्यानलिंगम हे वेलिंगिरी पर्वतरांगेच्या पायथ्याशी असलेले दक्षिणेकडील एक अद्वितीय शिवमंदिर होय. या ठिकाणी कोणतीही विशिष्ट कल्पना, प्रार्थना किंवा उपासनेची पद्धत स्वीकारलेली नाही. कोणत्याही धर्माचा कोणीही येथे येऊन ध्यानलिंगममध्ये साठवलेली ऊर्जा प्राप्त करू शकतो. त्या खोल अंधाऱ्या गुहेत प्रवेश करताच समोर एक विशाल शिवलिंग एका शक्तीगृहासारखे दिसते. खाली पाण्यात चमकणारे दिवे आणि फुललेली कमळे मनाला आनंदाने भरून टाकतात. फुलांच्या सुगंधाने सुगंधित वारा, सोन्याने जडलेल्या तांब्याच्या भांड्यातून लिंगावर टपकणाऱ्या पाण्याचा प्रतिध्वनी आणि पाण्यात दिव्यांचे प्रतिबिंब यामुळे मनाला अपार शांती मिळते. पर्यटक हे अलौकिक दृश्य उघड्या डोळ्यांनी पाहत राहतात. हे वर्णन कोइम्बतूरपासून ३० किलोमीटरवर, दक्षिण भारताचे मँचेस्टर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वेलिंगिरी पर्वतरांगाच्या पायथ्याशी असलेल्या 'ध्यानलिंगम' नावाच्या मंदिरातील शिवलिंगाचे आहे. आजकाल, देशात काही सर्वोत्तम धार्मिक आणि सांस्कृतिक केंद्रे बांधली गेली आहेत, जी केवळ प्राचीन भारतीय स्थापत्यकलेचे सर्वोत्तम उदाहरण नाहीत तर कलेच्या दृष्टिकोनातून देखील अद्वितीय आहे.

अहमदाबादमधील अक्षरधाम, दिल्लीतील कमळ मंदिर आणि कन्याकुमारीमधील अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि हिंद महासागर यांच्या संगमावर बांधलेले विवेकानंद स्मारक आता सर्वज्ञात आहे. ध्यानलिंगम मंदिराची गणना या श्रेणीत करता येते, ज्याचे उद्घाटन १९९९ मध्ये झाले. हे ध्यानलिंगम बांधण्याची प्रेरणा कर्मवीर योगी संत श्री सद्गुरू जग्गी वासुदेव यांना मिळाली, जेव्हा ते म्हैसूरमधील चामुंडी टेकडीच्या खडकावर ध्यान करत होते. या अनुभवाने त्यांच्या आयुष्यात खळबळ उडाली आणि त्यांनी ध्यानलिंग बांधण्याचा संकल्प केला. प्राचीन ग्रंथांमध्ये ध्यानलिंगाबद्दल फक्त गूढ वर्णन होते, म्हणून ही संकल्पना साकार करणे खूप कठीण काम होते. परंतु संत दृढनिश्चयी होते. त्यामुळे खोल अभ्यास आणि अंतर्ज्ञानाने त्यांना पुढे जाण्यास प्रेरित केले आणि नंतर हे स्वप्न साकार करण्यासाठी अनेक शिष्य, वास्तुविशारद, अभियंते आणि उदार मित्र त्यांच्यात सामील होऊ लागले. वेलिंगिरी पर्वतरांगांच्या पायथ्याशी असलेल्या घनदाट जंगलात एक जागा सापडली. मंदिराच्या रचनेत शास्त्रानुसार भौमितिक आकार, प्रदक्षिणा, गर्भगृह, मुख्य देवता, इतर देवता आणि वापरलेले बांधकाम साहित्य यांची बारकाईने काळजी घेण्यात आली. एका विशाल घुमटाच्या आकारात बांधण्याचा निर्णय घेतलेला गर्भगृह, सिमेंट, काँक्रीट आणि लोखंडी सळयांऐवजी पारंपरिक विटा, चुना, माती, वाळू, साल अमोनिया आणि विविध औषधी वनस्पतींपासून बनविलेले द्रावण वापरून बांधण्यात आला. घुमटाच्या रचनेत भारतीय



स्थापत्यशास्त्राचे नियम आणि नवीन संगणक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. घुमट अठरा महिन्यांत पूर्ण झाला आणि संपूर्ण संकुल बांधण्यासाठी तीन वर्षे लागली. जगातील पहिले 'ध्यानलिंगम' २४ जून १९९९ रोजी स्थापित झाले आणि २३ नोव्हेंबर १९९९ रोजी संपूर्ण संकुलाचे उद्घाटन झाले.

## मंदिर परिसरात काय अनुभवाल?

सर्वप्रथम आपण आत प्रवेश करताच, १७ फूट उंच पांढरा ग्रॅनाइटचा 'सर्वधर्म स्तंभ' आहे – ज्यावर जगातील प्रमुख धर्मांची चिन्हे कोरलेली आहे, ज्यावरून दिसून येते– 'हे मंदिर सर्व धर्मांच्या अनुयायांचे स्वागत करते.' या स्तंभाच्या मागे, मानवी शरीराचे सात चक्र दाखविले आहे. पुढे गेल्यावर आपल्याला मंदिराचे प्रवेशद्वार दिसते, जे प्राचीन स्थापत्यकलेचे एक अतुलनीय उदाहरण आहे. तम, रज आणि सत यांचे प्रतीक असलेल्या तीन तुलनेने उंच पायऱ्या आहेत. त्या उंच बनविल्या आहेत. जेणेकरून पायऱ्या उतरताना, मज्जासंस्थेच्या भागांवर विशेष दाब दिला जातो. ज्यामुळे शरीर आणि मन ध्यानलिंगातून प्रसारित होणारी ऊर्जा प्राप्त करण्यास तयार होते.

परिक्रमेकडे पुढे जाताना डाव्या बाजूला योगशास्त्राचे जनक पतंजलीची एक अतिशय प्रभावी उंच काळ्या ग्रॅनाइटची मूर्ती आणि एक विशाल शिवजी आहेत. उजवीकडे हिरव्या ग्रॅनाइटपासून बनविलेली वनश्रीची प्रतिकृती आहे. उंबरठ्यावर सिद्धीच्या अवस्थेचे प्रतीक असलेल्या सहा ध्यानस्थ त्रिकोणी मूर्ती आहे.

आता आपण घुमटाच्या आकारात बांधलेल्या त्या अनोख्या गुहेत प्रवेश करण्यास सज्ज आहोत. या घुमटाच्या बांधकामात एक अतिशय खास पद्धत अवलंबिण्यात आली आहे. त्याचा पाया दहा फूट खोल घेण्यात आला आहे. जमिनीपासून त्याची उंची ३३ फूट, व्यास ७६ फूट आणि वजन ७०० टन आहे. या प्रमाणात त्याची विशालता अनुभवता येते. हा घुमट सहा फूट उंच दगडी जोड्यांवर ठेवण्यात आला आहे.

संपूर्ण बांधकामात सिमेंट, रॉड किंवा कच्ची रचना वापरली गेली नाही. फक्त विटा आणि ग्रॅनाइट दगडी ब्लॉक एका विशेष तंत्राने जोडले गेले आहेत. गर्भगृहात हवा आणि प्रकाशासाठी अठ्ठावीस त्रिकोणी आकाशदिवे आहे आणि घुमटाच्या वरच्या बाजूला सोन्याच्या पानाने मढवलेले तांब्यापासून बनविलेले लिंगाच्या आकाराचे एक लहान घुमट बनविण्यात आले आहे, जे गर्भगृहातील गरम हवा बाहेर काढते आणि प्रकाश किरणांच्या थेट प्रवेशास देखील प्रतिबंधित करते. खाली बनविलेल्या आकाशदिवेतून थंड हवा गर्भगृहात प्रवेश करते. गर्भगृहाच्या आत, भाविकांना ध्यान करण्यासाठी २८ कोनाड्यासारख्या बसण्याच्या जागा बनविण्यात आल्या आहेत.

आता या घुमट आकाराच्या गर्भगृहात प्रवेश करा, जेथे वर उल्लेख केलेले शिवलिंग दिसते. या अंधाऱ्या गुहेत फक्त दिव्याचा प्रकाश आहे. आत, मध्यभागी, तेरा फूट नऊ इंच उंचीचे एक मोठे काळे ग्रॅनाइट शिवलिंग विशेषतः रसायनशास्त्रज्ञांनी तयार केलेल्या पाऱ्याच्या तळावर आहे. पांढऱ्या ग्रॅनाइटपासून बनविलेला एक मोठा नाग, तोंड उघडे ठेवून विश्रांतीच्या स्थितीत, सात वर्तुळांमध्ये गुंडाळलेला, शिवलिंगाला शोभतो.

तळाशी, पाण्याचे वर्तुळ आहे. यामध्ये संपूर्ण शिवलिंग तरंगताना दिसते. या पाण्यात लहान कमळे फुलत आहेत आणि दिव्यांच्या चमकत्या प्रकाशाने संपूर्ण परिसर प्रकाशित होत राहतो. शिवलिंग मानवी शरीराच्या सात चक्रांचे प्रतीक असलेल्या सात चमकदार तांब्याच्या वर्तुळांनी वेढलेले आहे. ज्यामुळे लिंगाचे सौंदर्य खूप आकर्षक बनते. लिंगाच्या वर ठेवलेल्या सोन्याच्या जडवलेल्या तांब्याच्या भांड्यातून थंड पाण्याने सतत अभिषेक केला जातो. या संपूर्ण सृष्टीला 'ध्यानलिंगम्' असे नाव देण्यात आले आहे.

प्राचीन भारतीय स्थापत्यकलेला वैज्ञानिक आधार देऊन ध्यानलिंग बांधण्यात आले आहे. त्याचा आकार, रंग समन्वय, परिसर इत्यादी ऊर्जा साठवतात आणि प्रकाशाच्या सतत किरणांप्रमाणे मानवाच्या शरीरावर आणि मनावर प्रभाव पाडत राहतात. म्हणूनच या ठिकाणी कोणतीही विशिष्ट कल्पना, प्रार्थना किंवा उपासनेची पद्धत स्वीकारण्यात आलेली नाही. कोणताही धार्मिक व्यक्ती येथे येऊन ध्यानलिंगात साठवलेली ऊर्जा प्राप्त करू शकतो. फक्त गुरू-शिष्याची भावना आवश्यक आहे. ध्यानलिंगाची स्थापना मनातील गुरुस्थानी करणे आणि डोळे मिचकावून न पाहता काही क्षण त्याकडे पाहणे आणि नंतर डोळे मिचकावून नियुक्त केलेल्या ठिकाणी बसणे पुरेसे आहे. या मंदिरात आणखी एक आश्चर्यकारक वैशिष्ट्य आहे – येथे प्रार्थना, आरती किंवा विधी नाही. दररोज दुपारी ११.५० ते १२.१० आणि सायंकाळी ५.५० ते ६.०० पर्यंत २० मिनिटे मानवाच्या भाषेचे, म्हणजेच ध्वनीचे पठण होते, ज्याला 'नाद आराधना' म्हणतात. पाण्याच्या लाटा आणि इतर वाद्यांमधून सुमधुर आवाज निर्माण होतो. ब्रह्मचारी आणि ब्रह्मचारिणी यांनी गायलेला मधुर आलाप प्रेक्षकांना स्वर्गीय आनंदाची अनुभूती देतो. या 'नाद आराधना' दरम्यान पर्यटकांनी उपस्थित राहावे आणि त्यांच्या हृदयातील नाद ब्रह्माला समजून घ्यावे. मंदिर परिसर सकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत पर्यटकांसाठी खुला असतो.



# पिंपरी-चिंचवडमध्ये १,१११ पिंडींचे शिवलिंग मंदिर

### गुप्त १२ ज्योतिर्लिंग; श्रावणात असते भक्तांची रीघ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

औद्योगिक नगरी म्हणून ओळख असणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरात भगवान शंकर यांचे एक अदभुत आणि विलोभनीय मंदिर बनविण्यात आले आहे. जेथे एक-दोन नव्हे तर तब्बल एक हजार १११ पिंड साकारण्यात आल्या आहेत. इतकेच नाही तर या तीन मजली मंदिराच्या वर कळस बसविण्याऐवजी २५ फुटांची भव्य पिंड बनविण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवडमधील चिखली जाधववाडी येथील हे कैलास सरोवर मंदिर आहे. जेथे १,१११ भगवान शिवजींच्या पिंड आहेत. त्याचबरोबर येथे मंदिराच्या मुख्यद्वारावरच भगवान शिवजींची मोठी मूर्ती आहे. तर दुसरीकडे मंदिरासमोर नंदीजी आणि पिंडीची मोठी भव्य मूर्ती आहे. श्रावण महिन्यात आणि अन्य दिवशी या मंदिरांमध्ये भगवान शिवजींच्या दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी पाहावयास मिळते. या मंदिराची एक विशेष गोष्ट म्हणजे या मंदिराच्या वर असलेली २५ फुटांची महादेवाची पिंड, कैलास सरोवर मंदिर बनविण्यामागे ईश्वर गुंडे यांची एक वेगळीच कहाणी आहे.

ईश्वर गुंडे ऊर्फ साईराम यांच्या चिखलीमधील या जागेत त्यांच्या कुटुंबाला एक बंगला बनवायचा होता. मात्र, बंगल्याचे बांधकाम सुरू झाल्यानंतर त्यांच्यासोबत अनेक किस्से घडले आणि त्यानंतर येथे बंगला न बनता भव्य मंदिर बनविण्यात आले. बांधकाम करताना सापडलेल्या भगवान शिवजींच्या पिंडाला ५१ फूट मोठे करत त्यांनी पिंडाची स्थापना केली. एक पिंड सापडली आणि त्यानंतर साईराम बाबांनी येथे एक हजार एकशे अकरा भगवान शिवजींच्या पिंड स्थापित केल्या. त्याचबरोबर त्यांनी या मंदिरात १२ ज्योतिर्लिंग मंदिर आणि गुप्त १२ ज्योतिर्लिंग बनविले. एवढेच नाही तर तीन मजली मंदिराच्या वर त्यांना तीन कळस बनवायचे होते. मात्र, त्यांच्या स्वप्नात शिव- पार्वती प्रकट झाले आणि पार्वती माता पिंडाच्या आणि भगवान शिवजी लिंगाच्या रूपात दिसले. त्यानंतर त्यांनी २५ फुटांची भव्य महादेवाची पिंड मंदिराच्या वर उभारली आहे. जी लांबूनच दिसून येते.

साईराम बाबा यांना नेहमीच असे वाटते, की भक्तांचे भले व्हावे. त्यासाठी त्यांनी एकाच ठिकाणी भगवान शिवजींच्या एक हजार १११ पिंड, राम दरबार, हनुमान मंदिर, संतोषी माता मंदिर, दर्गा, गणपती मंदिर, विष्णू मंदिर, साई मंदिर अशी अनेक मंदिर बनविली. साईराम बाबा यांना कैलास मानसरोवर मंदिराला भगवान शिवजींचे शक्तीपीठ बनवायची इच्छा आहे, त्यांचे म्हणणे आहे की येथे भगवान शिवजींच्या पिंडांचे दर्शन केल्यावर भक्तांना जीवंत शिवजींनाच दर्शन केल्याची अनुभूती मिळेल.

ईश्वर गुंडे ऊर्फ साईराम बाबा हे मूळ हैदराबादचे रहिवासी असून १९७१ मध्ये जेव्हा देशात दुष्काळ पडला तेव्हा ते नोकरीच्या शोधात आपल्या भावाकडे पुणे शहरात आले. त्यानंतर त्यांनी धोबीचे काम सुरू केले आणि बघता-बघता त्यांच्यासोबत चमत्कार होऊ लागले असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. पिंपरी-चिंचवडमधील चिखली परिसरातील कैलास मानसरोवर मंदिरात श्रावण मासाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर भक्तांची गर्दी पाहावयास मिळते. हे एक अद्भुत मंदिर असून येथे दर्शन केल्यावर मनःशांती मिळत असल्याचा अनुभव भक्त सांगतात. त्याचबरोबर पुणे आणि पिंपरी-चिंचवडकरांसाठी हे एक मोठी पर्वणीच असल्याचे देखील भक्तांचे म्हणणे आहे.

# भगवान शिवजींना ३ अंक का आवडतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

क्रमांक ३ हा शुभ अंक मानला जात नाही. परंतु जर तो भगवान शिवजींशी संबंधित असेल तर हा क्रमांक ३ त्यांना आणि त्याच्या भक्तांना अनेक मार्गांनी जोडतो. हे ३ क्रमांक भगवान शिव यांच्या प्रत्येक पैलूशी अशा प्रकारे जोडलेले आहेत की ही संख्या सामान्य संख्येऐवजी आध्यात्मिक संख्या बनली आहे. जर आपण नीट पाहिले तर भगवान शिव यांना तीन कड्या आहेत, त्रिशूळात तीन कड्या आणि तीन डोळे आहेत. त्यांना त्रिकालदर्शी आणि त्रिदेव म्हणतात आणि त्यांना अर्पण केलेल्या बेलपत्रातही तीन पाने असतात. तीनच्या संख्येत या गोष्टींच्या उपस्थितीचे भक्तांसाठी अनेक आध्यात्मिक अर्थ आहेत, जे खालीलप्रमाणे आहेत–



त्रिपुंड : भगवान शिव यांच्या कपाळावर तिलकाच्या तीन रेषा आहेत. ज्यांना 'त्रिपुंड' देखील म्हणतात. हे तीन गुण दर्शवितात– आत्मशरक्षण, आत्मप्रचार आणि आत्मबोध.

त्रिशूल : भगवान शिव यांच्या त्रिशूळाचे तीन भाग आहेत. जे त्यांच्या शक्ती आणि पराक्रमाचे प्रतीक आहे. त्रिशूलमध्ये आकाश, पृथ्वी आणि पाताळ यांचा समावेश होतो. त्रिशूल तामसिक गुण, राजसिक गुण आणि सात्त्विक गुण या तीन गुणांशी देखील संबंधित आहे.

त्रिनेत्र : भगवान शिव यांना तीन डोळे आहेत, जे त्यांचे ज्ञान, मन आणि आनंद दर्शवितात.

**भगवान शिवजींशी संबंधित ३ संख्यांचे रहस्य**

शिवपुराणातील त्रिपुरी दाह कथेत भगवान शिवजींशी संबंधित तीन अंकांचे रहस्य उलगडले आहे. या आख्यायिकेनुसार तीन राक्षसांनी तीन उडणारी शहरे निर्माण केली आणि या शहरांना त्रिपुरा असे नाव दिले. ही तीन शहरे वेगवेगळ्या दिशेने उडत राहिली. असुर दहशत निर्माण करून शहरांमध्ये जात असत. त्यामुळे कोणीही त्यांचे काहीही नुकसान करू शकत नव्हते. या तीन नगरांचा नाश केल्याशिवाय या तीन राक्षसांचा नाश होऊ शकत नव्हता. परंतु ही शहरे नष्ट करण्यात अडचण आली. तिघांनाही एकाच बाणाने मारता आले असते, पण तिघेही वेगवेगळ्या दिशेने उडत राहिले. त्यामुळे त्यांना एका ओळीत ठेवणे अशक्य होते. दैत्यांच्या दहशतीने देवांनाही खूप त्रास झाला. म्हणून त्यांनी भगवान शिवजींचा आश्रय घेतला. तेव्हा भगवान शिवजींनी त्यांची विनंती ऐकून पृथ्वीला रथ बनविले आणि सूर्य आणि चंद्र त्या रथाची चाके बनले. मदार पर्वताला धनुष्य बनवून त्यावर कालसर्प आदिशाची तार चढवली. भगवान विष्णू धनुष्याचे बाण झाले. ते या शहरांचा बराच वेळ पाठलाग करत राहिले. जेणेकरून त्यांना एका सरळ रेषेत पाहून त्यांचा नाश करता येईल. मग एके दिवशी तो क्षण आला, जेव्हा तिन्ही शहरे एका सरळ रेषेत आली आणि भगवान शिवजींनी बाण मारला. भगवान शिवजींच्या बाणांनी तिन्ही शहरे जळून खाक झाली. भगवान शिवजींनी या तीन नगरांची भस्म आपल्या शरीरावर लावली. म्हणूनच शिवजींना त्रिपुरारी असेही म्हटले जाते आणि तेव्हापासून भगवान शिवजींच्या उपासनेत तिघांचे विशेष महत्त्व असल्याचे मानले जाते.

# प्रसिद्ध शिव मंदिरे कोणती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात भगवान शिव यांना खूप महत्त्व आहे. भारतात अनेक प्रसिद्ध शिव मंदिरे आहेत. परंतु काही मंदिरांची त्यांच्या विशेष वैशिष्ट्यांमुळे एक वेगळी ओळख आहे. आपण अशाच काही शिव मंदिरांबद्दल जाणून घेऊ.

**तुंगनाथ मंदिर :** उत्तराखंडमधील गढवाल हिमालयात १२,००० फुटांपेक्षा जास्त उंचीवर वसलेले तुंगनाथ मंदिर हे जगातील सर्वांत उंच शिव मंदिर मानले जाते. तेथे पोहोचण्यासाठी चोपटा येथून ट्रॅक करावा लागतो. सभोवतालचे बर्फाच्छादित पर्वत आणि शांत वातावरण या मंदिराला अत्यंत विशेष बनवते. येथील शांत वातावरण भक्तांना गहन शांतीची भावना प्रदान करते.

**भोजेश्वर मंदिर :** मध्य प्रदेशातील भोजेश्वर मंदिर हे त्याच्या विशाल शिवलिंगासाठी ओळखले जाते. ११ व्या शतकात राजा भोजने याच्या बांधकामाची सुरूवात केली. परंतु हे मंदिर कधीही पूर्ण झाले नाही.

**जागेश्वर धाम :** उत्तराखंडच्या पाइन वृक्षांच्या जंगलांमध्ये वसलेला जागेश्वर धाम हा १०० हून अधिक प्राचीन मंदिरांचा समूह आहे. येथील शांत वातावरण भक्तांना ध्यानधारणा आणि आध्यात्मिक अनुभव देते.

**पाताल भुवनेश्वर :** उत्तराखंडमध्ये स्थित पाताल भुवनेश्वर हे देखील एक गुहा मंदिर आहे. येथील भूमिगत चुनखडीच्या गुहांमध्ये देवतांशी संबंधित नैसर्गिक रचना आहेत. येथे पोहोचण्यासाठी अरुंद मार्गांमधून मार्ग काढावा लागतो. गुहेच्या आत एक विशेष शिवलिंग आहे, जे स्थानिकांच्या मते दरवर्षी थोडे-थोडे वाढते. असेही म्हटले जाते, की ज्या दिवशी हे शिवलिंग गुहेच्या छताला स्पर्श करेल त्या दिवशी जगाचा अंत होईल.

**मातंगेश्वर मंदिर :** खजुराहो येथील मातंगेश्वर मंदिर देखील खूप प्राचीन आहे. येथे सुमारे ८ फूट उंच शिवलिंग आहे. ज्याची उंची दरवर्षी वाढते, असे मानले जाते.

**भूतेश्वर महादेव :** छत्तीसगडच्या जंगलात वसलेले भूतेश्वर महादेव हे एक विशाल, नैसर्गिकरित्या तयार झालेले शिवलिंग मानले जाते. या सर्व मंदिरांना त्यांच्या अद्वितीय वैशिष्ट्यांमुळे आणि खोल धार्मिक महत्त्वामुळे विशेष महत्त्व आहे.



# भगवान शिवजींनी कोणत्या घटनेनंतर गळ्यात नाग धारण केला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शिव यांच्या गणांमध्ये नागांचाही समावेश आहे. त्यापेक्षा भगवान शिव यांनी आपल्या गळ्यात नागदेवतेला स्थान दिले आहे. भगवान शिव वासुकी नाग आपल्या गळ्यात धारण करतात. एवढेच नाही तर शिवलिंगाची स्थापना कधीही एकट्याने केली जात नाही. त्यापेक्षा शिवलिंगासोबत नागदेवता नक्कीच विराजमान आहे. जेव्हा नागदेवता आणि नंदीची पूजा केली जाते तेव्हाच भगवान शिव यांची पूजा पूर्ण मानली जाते. नागपंचमीच्या दिवशी नागदेवता आणि भगवान शिव यांची पूजा केल्याने सुख आणि सौभाग्य वाढते. दरवर्षी नागपंचमीच्या दिवशी नागदेवतेची पूजा केली जाते. कालसर्प दोषापासून मुक्ती मिळविण्यासाठीही नागपंचमीचा दिवस खास मानला जातो. यासोबत राहू-केतू दोष दूर करण्यासाठी नागपंचमीच्या दिवशी उपाय केल्यास सर्व त्रास दूर होतात.

**भगवान शिव यांच्या गळ्याचा हार का बनला वासुकी नाग?**

हिंदू धर्मात आठ सापांचा उल्लेख आहे. म्हणजेच ८ नागांना देवता मानले गेले आहे. नागराज वासुकी हा भगवान शिव यांच्या गळ्यात राहणारा नाग आहे. शिवजींनी वासुकी नाग आपल्या गळ्यात धारण केला होता त्यामागे एक कथा आहे. समुद्रमंथन होत असताना वासुकी नागाला दोरीच्या रूपात मेरू पर्वताभोवती गुंडाळून मंथन करण्यात आले. त्यामुळे वासुकी नागाचे संपूर्ण शरीर रक्ताने माखले होते. तसेच जेव्हा समुद्रमंथनातून हलहल विष बाहेर आले तेव्हा भगवान शिव यांनी ते स्वीकारले होते. यावेळी वासुकी नागानेही भगवान शिव यांच्या मदतीसाठी काही विष घेतले. मात्र, हे विष घेतल्याने विषारी सापावर परिणाम झाला नाही. पण नागाची भक्ती पाहून शिवजी फार प्रसन्न झाले आणि तेव्हापासून भगवान शिवजी प्रसन्न झाले आणि त्यांनी वासुकी नागाला आपल्या गळ्यात आलिंगन दिले.

**देव दुष्टांनाही आशीर्वाद देतो**

भगवान शिवजींनी गळ्यात सापासारखा विषारी आणि धोकादायक प्राणी धरला आहे, हे देखील या वस्तुस्थितीचे प्रतीक आहे की वाईट लोकांनी चांगले काम केले तरी देव त्यांना आशीर्वाद देतो. म्हणूनच एखाद्या व्यक्तीने नेहमीच चांगले कार्य केले पाहिजे, मग त्याचा मूळ स्वभाव काहीही असो.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)